Indian Streams Research Journal
Volume-3, Issue- 9, Oct -2013
ISSN 2230-7850

Available online at www. lbp.world

# स्वातंत्र्यलढ्यातील सांगली जिल्ह्यातील हुतात्मे

**विवेकानंद माने**
सहा. प्राध्यापक, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू. लाड
महाविद्यालय, कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

**प्रस्तावना**

ब्रिटीश राजवटीत सातारा जिल्ह्यामध्येच सांगली जिल्ह्याचा समावेश होता. दिनांक ८ मार्च १९४७ रोजी सांगली, मिरज (सिनियर व ज्युनियर), बुधगाव, जत, औंध इत्यादी दक्षिण महाराष्ट्रातील संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४९ मध्ये वरील संस्थाने तसेच सातारा जिल्ह्यातील तासगाव, खानापूर, वाळवा व शिराळा हे चार तालुके हस्तांतरित करून आणि राज्याच्या इतर संलग्न भागातून मिरज व जत हे आणखी दोन तालुके निर्माण करून सहा तालुक्यांचा दक्षिण सातारा नावाचा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. कुरूंदवाड संस्थानातील वाटेगाव आणि इचलकरंजी संस्थानातील मणेराजुरी ही गावेही नव्या जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आली.[१] जिल्ह्याचे प्रशासकीय कार्यालय सांगली येथे ठेवण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर दिनांक २१ नोव्हेंबर १९६० रोजी जिल्ह्याचे नाव बदलून सांगली असे करण्यात आले. सध्या सांगली जिल्ह्यात मिरज, तासगाव, खानापूर, आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, वाळवा, शिराळा, पलूस व कडेगाव असे दहा तालुके आहेत.

सांगली जिल्हा महाराष्ट्र – कर्नाटकाचा सीमावर्ती जिल्हा आहे. कर्नाटकाचा बेळगाव जिल्हा सांगली जिल्ह्याला लागून आहे तसेच सांगली जिल्ह्यामध्ये विलीन झालेल्या पूर्वीच्या संस्थांनी प्रदेशाचा काही मुलुख हा कर्नाटकामध्ये गेला आहे. तथापि ही गावे मूळ सांगली जिल्ह्यांच्या संस्थानांमध्ये असल्याने त्यांचे वळण हे अद्यापि सांगली जिल्ह्याचे आहे. महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटक राज्यातील नेत्यांचा प्रभाव सांगली जिल्ह्यावर पडला आहे त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यातील नेत्यांचा प्रभाव कर्नाटक राज्यातील राजकीय चळवळीवर झालेला आहे.[२] प्रस्तुत शोधनिबंधात याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्यलढ्यात सांगली जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला आहे. सन १९३०–३२ च्या कायदेभंग चळवळीत या जिल्ह्यातील अनेक देशभक्तांनी भाग घेतला होता तसेच १९४२ च्या चले जाव आंदोलनात येथील स्वातंत्र्यसैनिकांनी प्राणाची बाजी लावली होती. जिल्ह्यातील अनेकांनी जुलूम जबरदस्ती आणि अत्याचार सहन केला. त्यांना कारावासाची सजा झाली. काहींनी कोवळ्या वयातच देशासाठी बलिदान केले तर काहींनी तारुण्यात राष्ट्राकरिता प्राणार्पण करण्यात धन्यता मानली. अनेकांना या स्वातंत्र्यलढ्यात हौतात्म्य लाभलेले दिसून येते.

शंकर भाऊ चांभार व धोंडी संतू कुंभार (मांगरूळ ता. शिराळा) या दोघांनी १९३०च्या कायदेभंग चळवळीत बिळाशी येथील सत्याग्रहात भाग घेतला होता. दि. ५ सप्टेंबर १९३० रोजी

झालेल्या पोलिस गोळीबारात हे दोघे ठार झाले. शंकर कृष्णा जोशी (ऐनापूर जि. बेळगाव) यांनी १९३०च्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला. पुढे बेकायदा ठरवलेल्या सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे डिक्टेटर म्हणून कार्य केले व त्यामध्ये त्यांना अटक झाली. एकूण अकरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा येरवडा तुरुंगात भोगत असतानाच सन १९३२ मध्ये त्यांचे निधन झाले. आष्ट्याचे केशवराव तळवळकर यांनीही कायदेभंग चळवळीत भाग घेऊन आपले प्राण देशासाठी वेचले.[३]

गणपती बाबाजी पाटील (कुरळप ता. वाळवा) १९४२ च्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. पोलिसांच्या गोळीबारात ते ठार झाले. उमाशंकर पंड्या हे मूळचे नागपूर भागातील मेकॅनिकल पदवी घेऊन किर्लोस्कर कारखान्यात किर्लोस्करवाडी येथे इंजिनियर म्हणून नोकरीस होते. त्यांच्या नेतृत्वाखाली कारखान्यातील कामगारांनी ८ सप्टेंबर १९४२ रोजी इस्लामपूर येथील सरकारी कार्यालयावर मोर्चा नेला होता. वाळवे तालुक्यातील कामेरीचा विष्णू बारबट्टे हाही या मोर्चात सहभागी झाला होता. मोर्चावर झालेल्या गोळीबारात दोघे हुतात्मा झाले.[४] वाळवे तालुक्यातील कापूसखेडचे शंकर बाळा खोडे यांचा बेळगाव जवळील हिंदलगा तुरुंगात २४ डिसेंबर १९४२ रोजी मृत्यू झाला. विटा येथील मामलेदार कचेरीवरील मोर्चाचे वेळी पलूस येथील अण्णा भरमा वडार यांना पोलिसांनी अमानुष मारहाण केली. पोलिसांनी केलेल्या मारहाणीत त्यांचा अंत झाला. बाबुराव जाधव (सांगली संस्थानातील शहापूर) यांना १९४२ च्या लढ्यातील सहभागाबद्दल अन्य तरुणांप्रमाणेच सांगली येथील राजवाड्यातील तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले होते. २४ जुलै १९४३ रोजी या तुरुंगातील तरुणांनी पोलिसांनाच कोंडले व आपली सुटका करून घेतली. पळून जात असताना झालेल्या गोळीबारात ते हुतात्मा झाले.[५]

चांदसाहेब बुवाशाह पटवेगार (आरळा ता. शिराळा) यांना स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे १३ फेब्रुवारी १९४३ रोजी पोलिसांनी पकडले. पोलिसांच्या त्रासामुळे त्यांची प्रकृती खालावली तशातच त्यांना क्षयाची बाधा झाली. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्यांची सुटका झाली परंतु साताऱ्यातून कोल्हापूरकडे नेत असताना रस्त्यातच त्यांचे निधन झाले. अण्णा आप्पा होरे (भोसे ता. मिरज) स्वातंत्र्य चळवळीत मदतकार्य करत असताना ब्रिटिश पोलिसांकडून ते पकडले गेले. विटा येथील तुरुंगात असतानाच आजारी पडले. या आजारपणात करावासामध्येच १९४३ साली त्यांचा मृत्यू झाला.[६]

सुलोचना रामचंद्र जोशी या शिराळा भागातील आरळे येथे वास्तव्यास होत्या. त्यांना समाजकार्याची आवड होती. त्या विविध ठिकाणी सभा घेऊन सभेत ब्रिटिशांविरुद्ध भाषणे देत असत. १९४२ च्या चळवळीत अशाच एका सभेनंतर पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांना सहा महिन्याची कारावासाची शिक्षा झाली. येरवडा तुरुंगात असतानाच एप्रिल १९४३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. रामचंद्र कृष्णा सुतार (मालगाव ता. मिरज) यांनी १९३० सालापासूनच चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली होती. १९४२ मध्ये म. गांधींनी 'चले जाव'ची घोषणा केली. 'करा अथवा मरा' असा त्यांनी संदेश दिला. त्या काँग्रेस सभेला हजर राहून परत येताच त्यांना अटक झाली व मिरजेच्या कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले. पुढे कराडच्या तुरुंगात असताना त्यांचा १९४३ च्या अखेरीस मृत्यु झाला. शांताराम अनंत गुमास्ते ( ता. खानापूर) यांनी चलेजाव चळवळीत सक्रिय भाग घेतला म्हणून पोलिसांनी पकडून हिंदलगा बेळगांव येथे स्थानबद्धतेत ठेवले. तेथेच २४ डिसेंबर १९४४ रोजी त्यांचा मृत्यू झाला.[७]

ज्येष्ठ नेते वसंतदादा पाटील आणि त्यांच्या सहकारी क्रांतिकारकांनी चले जाव आंदोलनाच्या वेळी ब्रिटिशांना त्राही भगवान करून सोडले होते. ब्रिटिश पोलिसांनी त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडून सांगलीच्या मध्यवर्ती कारागृहात ठेवले. मात्र दादा आणि त्यांचे सहकारी सांगलीच्या मध्यवर्ती कारागृहातून निसटले. दि. २४ जुलै १९४३ रोजी दुपारी तीन वाजता ही घटना घडली.[८] ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक बंदी म्हणून पोलिसांनी वर्णन केलेले वसंतदादा पाटील यांच्यासह १४ क्रांतिकारक सांगलीचा मध्यवर्ती तुरुंग फोडून गोळीबार करत बाहेर पडले. त्यांनी तुरुंगातील १९ बंदुका व १९२ काडतूस यांचे पट्टेही बरोबर नेले.[९] यावेळी पहाऱ्यावरील चारही पोलिसांना निशस्त्र

करण्यात आले. 'गडबड कराल तर ठार करू' असा सज्जड दम त्यांना देण्यात आला. तुरुंगाच्या दक्षिणेकडील बाजूला असलेल्या बुरुजावर चढून भिंतीवरुन उड्या टाकून आणि खंदकातून पोहून सर्वजण पुढे गेले. त्या दिवशी शनिवार होता. आठवड्याचा बाजार असल्याने टिळक चौक परिसरात गर्दी होती. त्यामुळे गर्दीतून वाट काढतच हातात बंदुका घेतलेले वसंतदादा आणि त्यांचे सहकारी आयर्विन पुलावर गेले. तेथे दादांनी पुन्हा हवेत गोळीबार केला. त्यानंतर पायऱ्या उतरून ते सांगलीवाडी नजीक पोचले. वारणा आणि कृष्णा दोन्ही नद्या दुथडी भरून वाहत होत्या. पोलिसांचा पाटलाग चुकविण्यासाठी कृष्णा नदी पार करून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. मात्र अण्णासाहेब पत्रावळे यांना फारसे पोहता येत नव्हते. तरीही ते इतरांना मदत करीत होते. मात्र दुर्दैवाने ते खोल पाणी आणि दलदलीत फसले. पोलिसांचा पाठलाग सुरूच होता. पत्रावळे बंदुकीच्या टप्प्यात येताच पोलिसांनी त्यांच्यावर झाडलेल्या गोळ्यांनी ते जागीच ठार झाले.[१०]

अनेक प्रकारच्या शस्त्रांनी सज्ज असलेल्या ब्रिटीश सरकारला भारताबाहेर घालविण्यासाठी संघर्ष करावयाचा असेल तर तो शस्त्रांनीच करावा लागेल व त्यासाठी भूमिगत चळवळीतील लोकांकडे शस्त्रे पाहिजेत तसेच ती हाताळण्याचे प्रशिक्षणही दिले पाहिजे या हेतूने आझाद हिंद फौजेच्या धर्तीवर नागनाथ नायकवडी यांनी वाळवा तालुक्यातील ढगेवाडीच्या डोंगरात फौजी ट्रेनिंग कॅम्प सुरू केले. या कॅम्पमध्ये सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेतील मनसा सिंग व नानक सिंग या दोघांना पंजाबमधून आणले. या दोघांनी वाळवा परिसरातील तरूणांना फौजी ट्रेनिंग दिले. या कॅम्पचा सुगावा पोलिसांना लागत असल्यामुळे कॅम्पचे ठिकाण वारंवार बदलावे लागत असे. वाळवा येथील किसन अहिर हे भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी इंग्रज सरकारविरुद्ध फौजी संघटना उभारण्याचा जो प्रयत्न वाळवा शिराळा भागात झाला त्यात ते अग्रभागी होते. त्यांच्या फौजी संघटनेस पकडण्यासाठी पोलिसांनी जंग जंग पछाडले. अशा वेळी २५ फेब्रुवारी १९४६ रोजी पोलिसांनी छापा घालून मणदुरीच्या डोंगरात किसन अहिर व नानक सिंग यांना घेरले यावेळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत दोघे हुतात्मे झाले. त्यानंतर हा कॅम्प बंद करावा लागला.[११]

मारुती ज्ञानू पाटील हे मूळचे बिळाशीचे होते. हवालदार म्हणून त्यांना शिराळा भागात ओळखले जात असे. मणदूरच्या डोंगरात त्यांना स्वातंत्र्य चळवळीत कार्य करत असताना मरण आले. प्रतापराव लक्ष्मणराव पाटील (व्याकूड जि. बेळगाव), नागनाथ नायकवडी व त्यांच्या साथीदार क्रांतीकारकांची एक गुप्त बैठक ऐतवडे बुद्रुक येथील जैन वस्तीत भरली होती. त्या बैठकीस प्रताप पाटील ही उपस्थित होते. या रात्रीच दि. २२ मे १९४६ रोजी प्रतापराव पाटील यांचा ऐतवडेच्या आदगोंडा दादा पाटील यांच्या घरी अज्ञात इसमांनी गोळीबार करुन बळी घेतला. बाबुराव धोंडी कोकाटे (रा. पडवळवाडी, कसबे वाळवा) हे महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरला होते. १९४६ मध्ये ऐतवडे बुद्रुकला गेले असता तेथे त्या रात्री झालेल्या गोळीबारात मृत्यू पावले.[१२]

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यलढ्यात सांगली जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला आहे. जिल्ह्यातील अनेकांनी ब्रिटिशांची जुलूम जबरदस्ती आणि अत्याचार सहन केला आहे. १९३० ते १९४७ या कालखंडात स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात शांततामय मार्गांनी आयोजित केलेल्या मोर्चे, निदर्शने यास ब्रिटिशांच्या पाशवी बळाच्या वापरामुळे सांगली जिल्ह्यातील या स्वातंत्र्यवीरांना हौतात्म्य प्राप्त झाले. स्वातंत्र्यलढ्यातील या संग्रामात कोवळ्या वयातील तरुण तसेच महिलाही सहभागी असल्याचे दिसून येते. त्यांच्या बलिदानाने आणि ब्रिटिशांच्या दमन नीतीमुळे सामान्य जनतेत ब्रिटीश सरकारविरुद्ध मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला. भूमिगत नेत्यांना लोकाश्रय मिळाला प्रतिसरकारची स्थापना होऊन ब्रिटिश सत्ता खिळखिळी केली गेली.

**संदर्भ:**


१) सांगली जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, १९६९, पृ. १

२) कोगनोळे विजय, सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, १९९२, पृ. ४

३) अंतुले ए. आर. (संपा.) 'सांगली जिल्हा हुतात्मा स्मरण' माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. ९ ते १०

४) सहस्त्रबुद्धे चिंतामणी : सांगली जिल्ह्याच्या इतिहासाची सुवर्णपाने, सकाळ पेपर्स लि. सांगली, २००९, पृ. ५४

५) अंतुले ए. आर. (संपा.), 'सांगली जिल्हा हुतात्मा स्मरण' उपरोक्त, पृ. १२

६) कित्ता, पृ. १४

७) कित्ता, पृ. १५

८) धर्माधिकारी भा. वि. महाराष्ट्राचा महापुरूषः वसंतदादा पाटील, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, १९८६ पृ. ३२

९) कित्ता, पृ. ३३

१०) मुंबई अर्काइव्हज, फाईल नं. १११०(११२), १९४३—४४, २६ जुलै १९४३ चा सातारा डी. एस. पी. ने डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटना सादर केलेला अहवाल.

११) धर्माधिकारी भा. वि., क्रांतिवीर—नागनाथ अण्णा नायकवडी चरित्र ग्रंथ, प्रकाशक, नागनाथ अण्णा नायकवडी गौरव समिती, वाळवा, २००७, पृ. ३६

१२) अंतुले ए. आर. (संपा.), 'सांगली जिल्हा हुतात्मा स्मरण', उपरोक्त, पृ. १८